01 MAR 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका

## मुंबई आयआयटीचे प्राध्यापक ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप यांचे प्रतिपादन : विज्ञान जागृती सप्ताहाचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वराज्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडावर तोफेचे कारखाने उभे केले. नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका, असे प्रतिपादन मुंबई आयआयटीचे प्राध्यापक, जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप यांनी केले.

आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून केंद्र सरकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील सीएफसी केंद्राच्या वतीने आयोजित विज्ञान साप्ताहाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.


कोल्हापूर : विद्यापीठातील आयोजित विज्ञान सप्ताहाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य वाटप करताना डॉ. बी. एन. जगताप, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत.

शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप म्हणाले, जगामध्ये युरोपात वाफेच्या इंजिनचा शोधाने औद्योगिक क्रांती झाली. पुरातन भारतही विज्ञाननिष्ठ होता, पण वाफेच्या इंजिनचा वापर भारतातील कामगारांनी केला असता तर सध्याचे चित्र वेगळे असते. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची ओळख करून देणे अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विज्ञानाबरोबरच इतर कौशल्य देखील विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत. विविध विभागांचे संशोधक विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी संशोधनात अग्रस्थानी राहतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत. यामधूनच नवीन संकल्पना जन्मास येतात, या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आपली आवड ओळखून आवडीच्या क्षेत्रातच करिअर करावे. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, विद्यापीठाला भेट दिलेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधून नवीन संशोधक निर्माण व्हावेत, अशी आशा आहे. सीएफसी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले.

सकाळ

# छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका

## प्रा. बी. एन. जगताप; विज्ञान सप्ताहाचा समारोप



कोल्हापूर, ता. २८ : नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडून विज्ञाननिष्ठा शिका, असे आवाहन मुंबई आयआयटीतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. बी. एन. जगताप यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी केंद्रातर्फे आयोजित विज्ञान साप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

प्रा. जगताप म्हणाले, "जगात युरोपीय क्रांतीनंतर वाफेच्या इंजिनाचा शोध तंत्रज्ञान विभागात घडलेले सर्वात मोठे परिवर्तन म्हणावे लागेल. विज्ञान फक्त शहरापर्यंत मर्यादित राहिले तर कोणतेही शाश्वत बदल होणार नाहीत. मात्र असे उपक्रम राबवून दुर्गम भागात विज्ञान पोहोचण्यासाठी अशा उपक्रमांची गरज पुन्हा अधोरेखित होत आहे."

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, "विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत. यातून कुतूहल निर्माण होते. यामधूनच नवीन संकल्पना जन्मास येतात. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आपली आवड ओळखून आवडीच्या क्षेत्रातच करिअर करण्याला प्राधान्य द्यावे."

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे डीन डॉ. आर. के. कामत, सीएफसी केंद्राचे संचालक आर. जी. सोनकवडे यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.